जमिनीच्या अकृषिक वापरासाठीचे परवानगी
अर्जाची नाममात्र किंमत जमा करण्यासाठी
लेखाशीर्ष —

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक एनएपी १०८८/प्र.क्र.१२७५/ल-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ फेब्रुवारी, १९९०.

पहा:- १] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एनएपी १०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक १२/१०/८८

२] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एनएपी १०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक १३/१२/८८

३] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक ६/१/१९९०

शासन निर्णय:

वरील शासन निर्णयाद्वारे जमिनीच्या अकृषिक वापरासाठी करावयाच्या अर्जाच्या किंमतीद्वारे जमा होणारी रक्कम दाखविण्यासाठी पुढील लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे:-

प्रधानशिर्ष : " मागणी क्रमांक - ००२९ जमीन महसूल "
गौणशिर्ष : " ८००-इतर जमा रकमा"
उपशिर्ष : " [अठरा] बिनशेती परवानगीसाठी करावयाच्या अर्जामुळे मिळणा-या रकमा "

२. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या नवीन लेखाशिर्षासाठी " ००२९-०२३-१ " हा नवीन संकेतांक दिलेला आहे. सर्व जिल्हाधिका-यांनी सर्व संबंधीत आहरण व संवितरण अधिका-यांना नवीन संकेतानुसार कारवाई करावी. तसेच संकेतांक बिनचूकपणे वापरण्यात यावे असे कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ त्रि.श. कर्वे ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
26 FEB 1990
शाखा - महसूल
नि. उ. जि. जिल्हाधिकारी

१] सर्व विभागीय आयुक्त
२] सर्व जिल्हाधिकारी.